महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १६८ वे | दिनांक : १३/०६/२०२६ | वार : शनिवार

## ३७० रुपयांची बिर्याणी अन् अश्लील टिप्पण्या भोवल्या:कॉमेडियन प्रणित मोरेसह तिघांवर गुन्हा



**मुंबई :** सोशल मीडियावर प्रेक्षकसंख्या आणि आर्थिक फायद्यासाठी महिला तसेच मृतदेहाबद्दल अत्यंत अश्लील आणि आक्षेपार्ह वक्तव्ये करणे स्टँडअप कॉमेडियन्सला चांगलेच भोवले आहे. 'बिग बॉस' फेम प्रसिद्ध स्टँडअप कॉमेडियन प्रणित मोरे, हिमांशू जांगडा आणि डॉ. सेजल पवार यांच्याविरोधात महाराष्ट्र सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या सर्व प्रकारावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना तीव्र शब्दांत आपली प्रतिक्रिया दिली असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे स्वैराचारात बदलू नये, असा कडक इशारा दिला आहे.

वादावर मुख्यमंत्री फडणवीसांची भूमिका स्पष्ट आपल्याकडे प्रत्येक व्यक्तीला भारताच्या संविधानाने अभिव्यक्तीचा अधिकार दिला आहे. पण त्याचवेळी अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य हे स्वैराचारामध्ये बदलू नये, अशी अपेक्षासुद्धा संविधानाने व्यक्त केली आहे. ज्यावेळी समाजाची मर्यादा तोडून आपण अभिव्यक्ती करतो, त्यावेळी संविधानाने इतरांना आदराने राहण्याचे जे स्वातंत्र्य दिले आहे, त्यावर आपण थेट अतिक्रमण करतो."

फडणवीस पुढे म्हणाले, मी स्वतः स्टँडअप कॉमेडी मोठ्या प्रमाणात ऐकतो आणि पाहतो. ते मनोरंजनाचे एक उत्तम साधन आहे, यात शंका नाही. स्टँडअप कॉमेडियन्सला नक्कीच अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, पण ते करत असताना सामाजिक मर्यादा काय आहेत, याचे भान ठेवले पाहिजे. समाजातील इतर लोकांच्या आदरपूर्वक जगण्याच्या स्वातंत्र्यावर कोणीही अतिक्रमण करू नये, अशी माझी स्पष्ट अपेक्षा आहे.

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर प्रणित मोरेच्या शोमधील काही व्हिडिओ क्लिप्स तुफान व्हायरल होत आहेत. यातील एका क्लिपमध्ये कॉमेडियन हिमांशू जांगडा याने एका डेटचा उल्लेख करताना, मुलीवर 370 रुपयांची बिर्याणी खर्च केली, तर तिच्याकडून ती वसुली (शारीरिक जवळीक) करण्याचा अधिकार पुरुषाला आहे, अशा आशयाची अत्यंत मानहानीकारक आणि अश्लील टिप्पणी केली होती. या वक्तव्यामुळे महिलांच्या संमती आणि प्रतिष्ठेच्या चिंधड्या उडवल्याचा आरोप होत असून, देशभरातून यावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

त्यासोबतच, याच कार्यक्रमाशी संबंधित दुसऱ्या एका क्लिपमध्ये डॉ. सेजल पवार हीने शैक्षणिक उद्देशासाठी वापरल्या जाणाऱ्या मृत पुरुषांविषयी अत्यंत अश्लील आणि अपमानजनक टिप्पणी केल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्र सायबर ॲक्शन मोडमध्ये; समन्स जारी महाराष्ट्र सायबर सेलने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. तपासादरम्यान हे स्पष्ट झाले आहे की, केवळ डिजिटल प्लॅटफॉर्मवर व्ह्यूज वाढवण्यासाठी, लोकांचा सहभाग खेचण्यासाठी आणि व्यावसायिक/आर्थिक फायद्यासाठी हा सामाजिक संकेत आणि मर्यादा ओलांडणारा मजकूर जाणीवपूर्वक प्रसारित करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी प्रणित मोरे, हिमांशू जांगडा आणि डॉ. सेजल पवार यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला असून, तिघांनाही चौकशीसाठी आणि जबाब नोंदवण्यासाठी सायबर कार्यालयासमोर हजर राहण्याचे समन्स बजावले आहे.

तरुणावरील कारवाईनंतर सोशल मीडियावर पुन्हा एकदा दोन गट पडले आहेत. त्यात एका गटाने या कारवाईचे समर्थन केले. बहुतांश नेटकऱ्यांनी कंपनीच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. लोकांच्या मते, "मुलींबद्दल अशी विकृत आणि अश्लील मानसिकता ठेवणाऱ्यांना असा धडा मिळणे गरजेचे होते, जेणेकरून भविष्यात कोणीही असे वक्तव्य करण्याचे धाडस करणार नाही." काही लोकांनी असेही म्हटले की, 'केवळ एका कॉमेडी शोमध्ये केलेल्या विधानामुळे किंवा चुकीच्या वक्तव्यामुळे एखाद्याची नोकरी घालवणे आणि त्याला उघड्यावर पाडणे जरा अतिरेकी ठरले.'

प्रणित मोरे आणि ₹370 ची बिर्याणी या वादाचे पडसाद आता थेट मुंबई पोलिसांच्या सोशल मीडिया पेजवर उमटले आहेत. जनजागृती करण्यासाठी नेहमीच धारदार, समकालीन आणि विनोदी पोस्ट टाकण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या मुंबई पोलिसांनी या 'सहमती'च्या वादावर इन्स्टाग्रामवर एक कडक पोस्ट शेअर केली, जी अल्पावधीतच व्हायरल झाली.

या पोस्टमध्ये एक स्वच्छ पांढरा ग्राफिक फोटो होता, ज्यावर मोठ्या अक्षरात ₹370 लिहिले होते आणि '0' च्या जागी बिर्याणीची प्लेट दाखवण्यात आली होती. मुंबई पोलिसांनी या चित्रावर लिहिले, "तुम्हाला ₹370 मध्ये बिर्याणीची प्लेट मिळते. आमच्या लॉक-अपमध्ये जास्त वेळ घालवल्यास मोफत जेवण मिळते." पोस्टच्या शेवटी पोलिसांनी #BiryaniIsNotConsent (बिर्याणी म्हणजे सहमती नव्हे) हा हॅशटॅग देखील वापरला. काहींनी या पोस्टकडे विनोदी अंगाने पाहिले, तर काही युजर्स यामुळे पोलिसांवर संतापले देखील.

## तुकाराम मुंढेचा दणका, गुटखा माफियांवर मकोका लावण्याचे आदेश



**मुंबई :** अन्न व औषध प्रशासनाचे सूत्र हाती घेतल्यानंतर आयएएस तुकाराम मुंढे यांनी राज्यभर धडक कारवाई सुरू केली आहे. अनेक ठिकाणी छापे मारून अवैध गुटखा, पान मसाले जप्त केले आहेत. तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या या कारवाईमुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत. या संपूर्ण कारवाई प्रकरणी मुंढे यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना तुकाराम मुंढे म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून आपल्याला माहीत आहे की महाराष्ट्रात गुटखा बंदी केली आहे. आपल्या एफएसएसएसआयच्या सेक्शन ३ नुसार प्रतिबंधित जे खाद्य पदार्थ आहेत, गुटखा किंवा तत्सम प्रकार जे आहेत त्यावर बंदी आहे. त्यावर आपण अनेकवेळा कारवाई करतो. छापे टाकतो, कारवाई करतो, अनेकांना जेल होते. परंतु, प्रतिबंधित असूनही अनेक ठिकाणी गुटखा विकला जातो आणि खाल्लाही जातो. मग यावर पर्याय काय आहे? जे उत्पादक आहेत ते बाहेरचे आहेत. त्यामुळे इथे जे विक्री करणारे आहेत, ट्रान्सपोर्ट करणारे आहेत, डीलर आहेत, हे एक रॅकेट आहे आणि हे उद्ध्वस्त करण्यासाठी स्ट्रॉंग स्टँड घेणे गरजेचे आहे, यावर शासन पोहोचले आहे.

पुढे बोलताना तुकाराम मुंढे म्हणाले, हे पदार्थ आरोग्याला हानिकारक आहेत आणि तरी सुद्धा अशा प्रकारे विक्री केली जात असेल तर त्यावर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. आज १२ जून रोजी मी मकोका (मोक्का) लावण्याचे आदेश पारित केले आहेत. यानुसार जे आदेश देण्यात आले आहेत, त्यात एक पेक्षा जास्त वेळा गुटखा बिझनेस करत आहेत त्याच्यावर माकोका लावण्यात येणार आहे. तसेच उत्पादन करणारे, उत्पादनाला पैसा पुरवणारे, ट्रान्सपोर्ट करणारे आणि एजंट, गोडाऊनवाले, होलसेल डीलर, रिटेल सेलर्स, अशा सर्वांवर माकोका लावण्यात येणार आहे.

तसेच तुकाराम मुंढे यांनी सांगितले की, या निर्देशांनुसार, प्रतिबंधित अन्नपदार्थांशी संबंधित प्रत्येक अंमलबजावणी कारवाईत अन्न सुरक्षा अधिकारी आणि नामनिर्देशित अधिकारी यांनी मकोका लागू होण्याची पात्रता तपासणे आवश्यक राहील. पात्रता सिद्ध झाल्यास संबंधित प्रकरणात अन्न सुरक्षा व मानके अधिनियमातील लागू तरतुदींसह मकोका अंतर्गतही कारवाई करण्यासाठी पोलिसांशी समन्वय साधला जाईल. मात्र, मकोका लागू करण्यासाठी अधिनियमाच्या कलम २३ अंतर्गत आवश्यक असलेली प्रक्रिया काटेकोरपणे पाळली जावी.

नव्या निर्देशांनुसार, आता केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करण्यापुरते मर्यादित न राहता, प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या अवैध व्यापारामागील संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. याअंतर्गत उत्पादक, वित्तपुरवठादार (फायनान्सर), मुख्य पुरवठादार, वाहतूकदार, गोदाम मालक, घाऊक आणि किरकोळ विक्रेते या सर्वांचे नेटवर्क भक्कम पुराव्यांच्या आधारे उघड केले जाईल. जर हे प्रकरण संघटित गुन्हेगारीच्या स्वरूपाचे असेल, तर उपलब्ध पुराव्यांनुसार या साखळीतील सर्व ज्ञात सदस्यांवर एकत्रित कठोर कारवाई करण्याचे धोरण अवलंबले जाईल. या व्यापक दृष्टिकोनामुळे या अवैध व्यवसायातील मुख्य सूत्रधार आणि खरे आर्थिक लाभार्थी थेट कायद्याच्या कचाट्यात सापडण्यास मदत होणार आहे.

## जेलमध्ये जावे लागले तर सर्वात आधी मी जाईन : कुणीही मागे हटणार नाही - अभिजीत दिपके



**लखनौ :** कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दीपके म्हणाले की, आपला देश एका आंदोलनातून घडला होता. आंदोलन झाले नसते तर आज स्वातंत्र्यही मिळाले नसते. जर देशात आणीबाणीविरोधात आंदोलन झाले नसते तर आज लोकशाही नसती. आंदोलन करणे ही सर्वात मोठी देशभक्ती आहे.

ते म्हणाले, सरकारला प्रश्न विचारण्यास कोणीही घाबरत नाही. आपल्याला हे आंदोलन सुरू ठेवायचे आहे. कोणीही मागे हटणार नाही. जर तुरुंगात जाण्याची गरज पडली तर, सर्वात आधी मी तुरुंगात जाईन. लेखपाल असो, UPSI असो, NEET असो किंवा CBSE, जे कोणी पेपर लीक करण्यास दोषी असतील, त्या सर्वांना राजीनामा द्यावा लागेल.

अभिजीत दीपके यांनी आज, शुक्रवारी लखनौच्या इको गार्डनमध्ये हे सांगितले. इको गार्डनमध्ये विद्यार्थी आणि वन-डे परीक्षेची तयारी करणाऱ्या सुमारे ६ हजार उमेदवारांनी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत निदर्शने केली. अभिजीत दीपकेही यात सहभागी झाले होते. ते सुमारे ४० मिनिटे थांबले. त्यांनी सर्व लोकांना २० जून रोजी दिल्लीला येण्याचे आवाहन केले.

तरीही, काही विद्यार्थी-उमेदवारांनी कॉकरोच पार्टी आणि अभिजीत दीपके यांचा विरोधही केला. ते म्हणाले- आमच्या या आंदोलनाचा कॉकरोच पार्टीशी काहीही संबंध नाही. ते राजकारण करत आहेत. जर अभिजीत दीपके इथे आले, तर आमचं आंदोलन उद्ध्वस्त होईल.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ जून २०२६

# शेतकऱ्यांना नवे आत्मभान देण्याची गरज -'पोशिंदा'कार सुनील डोके

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** चौका घाटाजवळील डोंगरे वस्तीच्या शेतात ११ जून रोजी आयोजित 'तिफण मृगोत्सवात' शेतकऱ्यांच्या प्रश्नावर साहित्य, लोककला आणि तज्ज्ञांच्या संवादातून वैचारिक पेरणी करण्यात आली.त्रैमासिक 'तिफण', भाषा-साहित्य-संस्कृती-संशोधन परिषद आणि सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा मृगोत्सव पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक तिफण पूजनाने झाली. शेतकऱ्यांच्या हस्ते उदघाटन झाले. खऱ्या शेतकऱ्याच्या हातून फाळाला हळद-कुंकू लावून उद्घाटन करण्यात आले.विचारांची पेरणी या सत्रात ग्रामसुराज्य फाऊंडेशनचे संचालक आणि जलतज्ञ प्रकाश चोले यांनी पाणी नियोजनाशिवाय समृद्धी शक्य नसल्याचे सांगितले. चौका परिसरात जलसिंचनाच्या कामासाठी तांत्रिक सहकार्य देण्याची ग्वाही त्यांनी दिली. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत मुगले यांनी सेंद्रीय शेतीचा आग्रह धरला, तर ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाघ यांनी शेतकरी हिताच्या उपक्रमात तनमन धनाने सहकार्य करण्याची ग्वाही दिली. डॉ. रामचंद्र झाडे यांनी संत साहित्यातील शेती-पर्यावरण दृष्टीचा आढावा घेतला. यावेळी 'तिफण'चा मराठवाडा साहित्य विशेषांक प्रकाशित झाला आणि तीन प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.कविसंमेलनाचे अध्यक्षस्थान सुनील डोके यांनी भूषवले. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करून तिफण मृगोत्सवातून शेतीमातीच्या प्रश्नावर चर्चा होऊन शेतकरी समाजाला नवे आत्मभान येईल. शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस अधिक क्लिष्ट होत असून तो कायम शोषणाचा बळी ठरला आहे. अशा कार्यक्रमातून त्यांना जगण्यास बळ मिळेल. साहित्यिक व समाज यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ होऊन नवे विषय लेखनात येईल. लेखकांनी आता शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहावे असे आवाहन त्यांनी केले. अशोक शेवगण, प्रकाश साळवे, संदीप ढाकणे, डॉ. सुभाष बागल, वृषाली सोनवणे, दिपाली देवरे, ज्ञानदेव डिघोळे, डॉ. नागेश बोनतेवाड, विजय कुमार पांचाळ यांसह कवींनी शेतकरी आत्महत्या, पाणी प्रश्न, पर्यावरण बदल आणि ग्रामीण स्त्रीच्या कष्टांवर कविता सादर केल्या.संत भगवान बाबा लोककला मंच, चौका यांनी व्यसनमुक्ती, घंटागाडी, पाणी प्रश्न आणि पर्यावरण जागृती यावर गीत व साभिनय सादरीकरण करून प्रबोधन केले. रामभाऊ डोंगरे आणि संचाने सादरीकरण केले.दिवसभराच्या चर्चेअंती चौका परिसराला पर्यटन स्थळ घोषित करणे, सरसगट कर्जमाफी, ऑनलाईन खते नोंदणी रद्द करणे, पिकाला हमी भाव, सुखना नदी पुनरुज्जीवनासाठी निधी आणि दुधदर वाढवणे यासह आठ ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. तिफण मृगोत्सव दरवर्षी भरवण्याचा ठरावही करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. सूत्रसंचालन विजयकुमार पांचाळ आणि आभार प्रदर्शन प्रकाश साळवे यांनी केले. समारोप डॉ. रामचंद्र झाडे यांनी केला. आयोजनासाठी रामभाऊ डोंगरे, दगडूभाऊ वाघ, संतोष वाघ, शंकर बोंगाणे, विश्वनाथ डोंगरे, सोमिनाथ वाघ यांसह आयोजक मंडळाने परिश्रम घेतले.

शांतीनाथ गुजले भाऊसाहेब गुजले वामन घुगे राजू वाघ मधुकर साळवे संतोष माळी धृपदवाघ साहेबराव वाघ राहुल वाघ शंकर बोंगाणे विजय डोंगरे शेतकरी अरुण भोसले साहेबराव वाघ वामन घुगे, संदिप गोमटे सुभाष शेठ संतोष भोसले गुडू डोंगरे, अमोल घुगे, कारभारी वाघ, शेख जावेद, प्राचार्य जगदाळे.

# वडनेर प्रा. आरोग्य केंद्र जनआरोग्य समिती अध्यक्षपदी मंजुषा मलदुडे




**कन्नड (अरुण थोरात) :** वडनेर ता. कन्नड प्राथमिक आरोग्य केंद्र येथील 'जन आरोग्य समिती' अध्यक्षपदी जेहूर जि.प. गटातील सदस्या मंजुषा मलदुडे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी जि.प.सदस्या डॉ. तृप्ती राजपूत, डॉ. दिलीपसिंग राजपूत यांची प्रमुख उपस्थितीती होती. प्रा.आ.केंद्र वडनेर येथे दि.12 जून रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत आरोग्य केंद्रातील सुविधां बाबत चर्चा करण्यात आली. आरोग्य केंद्र ईमारतीची झालेली दुरावस्था, वैद्यकीय अधिकारी, क्लर्क, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, शिपाई आदी कर्मचाऱ्यांची रक्त पदे, केंद्रासाठी पाणीपुरवठा, परिसरातील अस्वच्छता, कुटूंब नियोजन शिबरे, आदींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जेष्ठ नेते डॉ. दिलीपसिंग राजपूत यांनी ईमारत व परिसरातील अस्वच्छता बाबत नाराजी व्यक्त केली. तसेच उपस्थित सदस्यांनी समस्या मांगल्या, यावर जि.प. सदस्या मंजुषा मलदुडे यांनी आरोग्य केंद्र ईमारती भरीव निधी मंजूर असून लवकरच काम सुरु होईल, रिक्त पदे, पाणीपुरवठा आदीं बाबत पाठपुरावा करुण समस्या सोडवल्या जाईल असे आश्वासन दिले.याप्रसंगी जन आरोग्य समिती अध्यक्षा मंजुषा मलदोडे, सहअध्यक्ष ता.आ.अ. डॉ. योगेश सोळंके, जि. प. सदस्य डॉ. तृप्ती दिलीपसिंग राजपूत, सचिव वैद्यकीय अधिकारी श्रीमती डॉ. किरंगे, सदस्य डॉ. अभिषेक राठोड, पर्यवेक्षिका उर्मिला दळवी, युवा स्वयंसेवक सुदाम पवार, अतिथी डॉ. दिलीपसिंग राजपूत, भाजप युवानेते महेश मलदोडे, गोपालसिंग राजपूत, अरुण थोरात, शशिकांत नागरे, नितीन दराडे सह प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ जून २०२६

## पारिजात

पारिजातकाचे फुलं
रात्रीला उमलती
मऊ मुलायम पाकळ्या
मंद सुगंध देती

सकाळी पडतो
फुलांचा सडा
वेचता वेचता
जीव होई वेडा

ओंजळीत फुलं
आनंदाने घेऊ
भक्तीभावाने
देवाला वाहू

कळ्या उमलती
हिरव्या पानात
चैतन्याचा दरवळ
प्रत्येकाच्या मनात

चंद्राच्या प्रकाशात
फुलं आनंदीत होती
सकाळी सकाळी
दवबिंदूत न्हाती



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## बाबासाहेब, तुमच्यामुळे...

लहान असताना पायात चप्पल नव्हती,
डोक्यावर उन्हाचा तडाखा होता;
गरिबीच्या अंधाऱ्या वाटेवर,
संघर्षच माझा साथी होता.
शिक्षणाची दारे बंद होती,
स्वप्नांनाही किंमत नव्हती;
माणूस असूनही माणुसकीची,
जगात काहीच हमी नव्हती.
पण तुम्ही उभे राहिलात बाबासाहेब,
वादळांशी दोन हात करत;
ज्ञानाचा दीप हातात घेऊन,
अंधाराला आव्हान देत.
तुमच्या लेखणीने हक्क दिले,
संविधानाने समानता दिली;
शतकानुशतकांच्या वेदनांना,
नव्या आशेची दिशा दिली.
काल पायात चप्पल नव्हती,
आज विमानाने जग फिरतो;
हे केवळ माझे यश नाही,
तुमच्या विचारांचे फळ मानतो.
तुम्ही दिला शिक्षणाचा मंत्र,
तुम्ही दिला स्वाभिमान;
म्हणूनच आज उभा आहे मी,
घेऊन स्वतःची ओळख आणि मान.
प्रत्येक यशाच्या शिखरावर,
तुमच्या संघर्षाचा वाटा आहे;
माझ्या उंच भरारीमागे,
तुमच्या विचारांचा झरा आहे.
म्हणून आज अभिमानाने म्हणतो—
"काल पायात चप्पल नव्हती,
आज विमानाने फिरतो आहे;
बाबासाहेब, हे सगळं
तुमच्या ज्ञानक्रांतीमुळे आहे!"



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या विविध योजनांसाठी अर्ज करावेत

**बीड (भगवंत पाळवदे) :** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामार्फत अनुसूचित जातीतील गरजू आणि तरुण उद्योजकांसाठी आर्थिक वर्ष २०२६-२०२७ करिता विशेष घटक योजना आणि बीजभांडवल योजना राबविण्यात येत आहेत. या दोन्ही योजनांसाठी जिल्ह्याला प्रत्येकी २० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, पात्र इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

इच्छुक उमेदवारांनी mahadisha.mpbcdc.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने कर्ज मागणी अर्ज भरायचा आहे. अर्जदाराने स्वतःच्या वैयक्तिक ई-मेल आयडीचा वापर करूनच अर्ज करणे बंधनकारक आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची मूळ प्रत आणि आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती लाभार्थ्यांने स्वतः जिल्हा कार्यालयात आणून जमा करायच्या आहेत. कोणत्याही त्रयस्त व्यक्तीमार्फत आलेले अर्ज किंवा कागदपत्रे स्वीकारली जाणार नाही. असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.




## साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विठ्ठल अनमुलवाड यांना 'महाराष्ट्र साहित्यरत्न पुरस्कार' जाहीर



**छत्रपती संभाजीनगर :** साहित्य क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे लेखक विठ्ठल अनमुलवाड यांना युनिव्हर्सल युनिटी फाउंडेशनतर्फे प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र साहित्यरत्न पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे.अनमुलवाड यांनी पुस्तक लेखन, बाल मासिकांमधील साहित्यनिर्मिती तसेच विविध वर्तमानपत्रे, आणि मासिकांमधून प्रकाशित झालेल्या लेखांच्या माध्यमातून साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या लेखनातून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विषयांची प्रभावी मांडणी होत असल्याने वाचकवर्गात त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.साहित्यसेवेतील या योगदानाची दखल घेत युनिव्हर्सल युनिटी फाउंडेशनने त्यांना 'महाराष्ट्र साहित्यरत्न पुरस्कार' जाहीर केला आहे. हा पुरस्कार त्यांच्या साहित्यिक कार्याला मिळालेली महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे.पुरस्कार जाहीर झाल्यानंतर साहित्यप्रेमी, वाचक, मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त करताना विठ्ठल अनमुलवाड यांनी हा पुरस्कार आपल्या वाचक, सहकारी आणि कुटुंबीयांच्या प्रेरणा व पाठिंब्याचे फलित असल्याची भावना व्यक्त केली.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ जून २०२६

# पावसाच्या चाहुलीत पेरणीचे नियोजन : बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांची सज्जता

**भा**रतीय कृषी व्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आजही मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबून आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रगतीची अनेक शिखरे गाठली असली, तरी शेतीच्या बाबतीत पाऊस हा अजूनही सर्वांत महत्त्वाचा घटक मानला जातो. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात खरीप हंगामाची सुरुवात ही मान्सूनच्या आगमनाशी निगडित असते. जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागलेल्या असतात. काळे ढग दाटून येतात, वाऱ्यांची दिशा बदलते आणि वातावरणात ओलावा वाढू लागतो. ही केवळ ऋतूची चाहूल नसते, तर ती लाखो शेतकरी कुटुंबांच्या आशा-आकांक्षांची सुरुवात असते. बी-बियाण्यांच्या पिशव्या, नांगरलेली शेतजमीन, खतांची उपलब्धता आणि आर्थिक नियोजन या साऱ्या गोष्टी पावसाच्या वेळेवर आणि स्वरूपावर अवलंबून असतात. त्यामुळे पेरणीसाठी योग्य वेळ निश्चित करणे ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची बाब ठरते.सन २०२६ च्या खरीप हंगामाकडे पाहिले असता, हवामानातील बदल आणि मान्सूनच्या अनिश्चित स्वरूपामुळे शेतकऱ्यांसमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत. भारतीय हवामान विभागाने यंदा मान्सून समाधानकारक राहण्याची शक्यता व्यक्त केली असली, तरी पावसाचे भौगोलिक वितरण, त्याची तीव्रता आणि कालावधी यामध्ये असमानता आढळण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही भागांत अतिवृष्टी, तर काही ठिकाणी दीर्घकालीन पावसाचा खंड अशा परिस्थितींना सामोरे जाण्याची तयारी शेतकऱ्यांना ठेवावी लागत आहे. त्यामुळे केवळ पाऊस सुरू झाला म्हणून पेरणी करण्याऐवजी, त्याची सातत्यता आणि जमिनीत साचणारी ओल यांचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक ठरते.महाराष्ट्रातील खरीप हंगामात प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, भात, मका आणि बाजरी यांसारख्या पिकांची लागवड केली जाते. राज्यातील विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या विभागांमध्ये पर्जन्यमान आणि जमिनीचा प्रकार वेगवेगळा असल्याने पेरणीचा कालावधीही बदलतो. कोकणात जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पेरणी सुरू होते, तर मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत पावसाच्या नियमिततेनुसार जूनच्या उत्तरार्धात किंवा जुलैच्या प्रारंभी पेरणी केली जाते. कृषी तज्ज्ञांच्या मते, सलग काही दिवस पुरेसा पाऊस झाल्यानंतर जमिनीत आवश्यक ओल निर्माण झाल्यासच पेरणी करणे अधिक फायदेशीर ठरते. घाईघाईने केलेली पेरणी आणि त्यानंतर पडलेला पावसाचा खंड यामुळे दुबार पेरणीची वेळ येऊ शकते, ज्याचा थेट परिणाम उत्पादन खर्चावर होतो.बदलत्या हवामानामुळे शेती क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्यांचे गांभीर्य दिवसेंदिवस वाढत आहे. तापमानातील वाढ, अवेळी पाऊस, गारपीट, दीर्घकाळ दुष्काळी परिस्थिती किंवा अचानक होणारी अतिवृष्टी या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम हा कृषी क्षेत्रावर होत असून, त्याचा फटका सर्वसामान्य शेतकऱ्यांना बसत आहे. शेतीमालाच्या उत्पादनात घट, रोग-किडींचे वाढते प्रमाण आणि उत्पादन खर्चातील वाढ यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच डळमळीत होत आहे. त्यामुळे हवामानाशी सुसंगत शेती व्यवस्थापन विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे.आजच्या काळात हवामानाचा अंदाज आणि कृषी नियोजन यांचा परस्परसंबंध अधिक दृढ झाला आहे. भारतीय हवामान विभाग, कृषी विद्यापीठे आणि कृषी विज्ञान केंद्रांकडून वेळोवेळी शेतकऱ्यांना हवामानविषयक सल्ला दिला जातो. मोबाईल संदेश, विविध ॲप्स, रेडिओ, दूरदर्शन आणि सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून हवामानविषयक माहिती सहज उपलब्ध होत आहे. तथापि, या माहितीचा उपयोग करून वैज्ञानिक पद्धतीने निर्णय घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे. हवामानाचा अंदाज, पिकांची निवड, पेरणीचा कालावधी आणि खत व्यवस्थापन यांचा योग्य समन्वय साधल्यास संभाव्य नुकसान टाळता येऊ शकते.पेरणीपूर्व नियोजनामध्ये जमिनीची तयारी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. उन्हाळ्यात खोल नांगरट केल्यामुळे जमिनीतील कीड-रोगांचे नियंत्रण होण्यास मदत होते. तसेच पावसाचे पाणी जमिनीत अधिक प्रमाणात मुरते. शेतातील तणांचे व्यवस्थापन, बांधबंदिस्ती, चर खोदणे आणि मृदसंधारणाच्या उपाययोजना या गोष्टी वेळेत पूर्ण करणे आवश्यक असते. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करण्यासाठी शेततळी, जलसाठे आणि समतल चर यांचा उपयोग प्रभावी ठरू शकतो.बियाण्यांची निवड करताना शेतकऱ्यांनी केवळ बाजारातील उपलब्धतेवर अवलंबून न राहता, स्थानिक हवामान आणि जमिनीच्या प्रकारानुसार शिफारस केलेल्या जातींची निवड करावी. कृषी विद्यापीठांनी विकसित केलेल्या सुधारित आणि रोगप्रतिकारक जातींचा अवलंब केल्यास उत्पादनवाढीस मदत होते. प्रमाणित बियाण्यांचा वापर, बीजप्रक्रिया आणि योग्य अंतर राखून पेरणी या बाबींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. बियाण्यांचा दर्जा हा उत्पादनाच्या गुणवत्तेशी थेट संबंधित असल्याने, त्यामध्ये कोणतीही तडजोड करता कामा नये.मृदा परीक्षण हे आधुनिक शेतीचे महत्त्वाचे अंग मानले जाते. जमिनीतील अन्नद्रव्यांची उपलब्धता, सामू, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण आणि इतर घटकांची माहिती मृदा परीक्षणाद्वारे मिळते. त्यानुसार खतांचा संतुलित वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होतो आणि जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवता येते. अनेकदा शेतकरी अंदाजाच्या आधारावर खतांचा वापर करतात, परिणामी अनावश्यक खर्च वाढतो. मृदा आरोग्य पत्रिकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धतीने खत व्यवस्थापन करता येते.शेती क्षेत्रात पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणे आज अत्यंत आवश्यक झाले आहे. पूर्वीचे शेतकरी स्थानिक हवामान, पक्ष्यांचे स्थलांतर, वाऱ्यांची दिशा आणि निसर्गातील बदल यांच्या आधारे शेतीचे नियोजन करीत असत. आज उपग्रह तंत्रज्ञान, हवामान अंदाज प्रणाली, ठिबक सिंचन, यांत्रिकीकरण आणि डिजिटल कृषी सेवा यांचा वापर करून अधिक अचूक नियोजन करता येत आहे. मात्र, या तंत्रज्ञानाचा लाभ लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.कृषी क्षेत्रातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाणही वाढत आहे. उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार, कर्जाचा बोजा आणि नैसर्गिक आपत्ती यांचा एकत्रित परिणाम त्यांच्या जीवनमानावर होत आहे. त्यामुळे शेती ही केवळ उत्पादनाची प्रक्रिया नसून, ती सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेशी निगडित बाब असल्याचे लक्षात घ्यावे लागेल. शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ आणि मानसिक आधार देण्याची जबाबदारी समाज आणि शासन या दोघांचीही आहे.खरीप हंगामाच्या सुरुवातीला घेतलेले योग्य निर्णय संपूर्ण हंगामाच्या यशावर परिणाम करतात. पावसाचे आगमन, त्याची सातत्यपूर्ण नोंद, मृदेतील ओलावा आणि उपलब्ध संसाधने यांचा सखोल विचार करून पेरणी केल्यास संभाव्य जोखीम कमी करता येते. बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांची सज्जता ही केवळ तांत्रिक बाब नसून, ती दूरदृष्टी, शिस्त आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांची एकत्रित अभिव्यक्ती आहे.आज गरज आहे ती शेतकऱ्यांपर्यंत योग्य माहिती वेळेत पोहोचविण्याची. कृषी विभाग, संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे आणि स्वयंसेवी संस्था यांनी समन्वयाने काम करून हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या शेती पद्धतींचा प्रसार करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या अनुभवांना आणि स्थानिक ज्ञानाला आधुनिक विज्ञानाची जोड मिळाल्यास कृषी क्षेत्र अधिक सक्षम बनू शकते.महाराष्ट्राच्या कृषी परंपरेने अनेक संकटांचा सामना करत प्रगतीचा मार्ग शोधला आहे. दुष्काळ, पूर, बाजारपेठेतील अनिश्चितता आणि बदलते हवामान या सर्व आव्हानांवर मात करत शेतकरी आजही नव्या आशेने पेरणीसाठी सज्ज होत आहे. पावसाच्या प्रत्येक सरीसोबत त्याच्या मनात नव्या स्वप्नांची पालवी फुटत असते. हीच जिद्द आणि कष्ट करण्याची तयारी महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीची खरी ताकद आहे.कृषी क्षेत्रातील बदलत्या वास्तवाचा विचार करता जलव्यवस्थापनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश असला, तरी पाण्याच्या उपलब्धतेच्या बाबतीत अनेक भाग संवेदनशील आहेत. कोकणातील अतिवृष्टी आणि मराठवाडा-विदर्भातील दुष्काळी परिस्थिती हे विरोधाभासी चित्र राज्यात वारंवार पाहायला मिळते. अशा परिस्थितीत पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. शेततळी, बंधारे, समतल चर, शेतबांध, कंटूर बंडिंग, पाझर तलाव आणि जलसंधारणाच्या इतर उपाययोजनांमुळे पाण्याचा कार्यक्षम वापर करता येतो. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जतन करण्याची मानसिकता विकसित झाली, तर भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींमुळे पाण्याची बचत होण्याबरोबरच खतांचाही कार्यक्षम वापर शक्य होतो. विशेषतः फळबागा, भाजीपाला आणि नगदी पिकांसाठी या पद्धती अत्यंत उपयुक्त ठरतात.खरीप हंगामात पीक संरक्षण हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे विविध रोग आणि किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. सोयाबीनवरील खोडमाशी, कापसावरील गुलाबी बोंडअळी, तुरीवरील शेंगा पोखरणारी अळी, भातावरील करपा रोग यांसारख्या समस्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. अशा वेळी एकात्मिक पीक संरक्षण व्यवस्थापनाचा अवलंब करणे आवश्यक ठरते. रोग आणि किडींची लक्षणे वेळेत ओळखणे, जैविक नियंत्रण साधनांचा वापर करणे, फेरपालट पद्धतीचा अवलंब करणे आणि आवश्यकता असेल तेव्हाच शिफारशीनुसार रासायनिक कीटकनाशकांचा वापर करणे, या उपाययोजनांमुळे पीक संरक्षण अधिक परिणामकारक बनते. अनेकदा जाहिरातींच्या प्रभावाखाली येऊन शेतकरी अवाजवी प्रमाणात औषधांचा वापर करतात. त्यामुळे उत्पादन खर्च वाढतो, पर्यावरणीय संतुलन बिघडते आणि मातीच्या गुणवत्तेवरही विपरीत परिणाम होतो. कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग्य निर्णय घेणे अधिक हितावह ठरते.आजच्या काळात कृषी सल्लागारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली आहे. कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, तालुका कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी आणि विविध संशोधन संस्था या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक माहिती उपलब्ध करून दिली जाते. मोबाईल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे हवामान अंदाज, बाजारभाव, रोग-किडींची माहिती आणि पीक व्यवस्थापनाचे सल्ले शेतकऱ्यांपर्यंत सहज पोहोचू लागले आहेत. तथापि, माहितीची विश्वासार्हता आणि तिचा योग्य वापर याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कृषीविषयक निर्णय घेताना प्रमाणित स्रोतांवर आधारित माहितीचा वापर करणे ही आजच्या शेतकऱ्याची गरज बनली आहे.शासनाच्या विविध योजनाही शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. प्रधानमंत्री पीक विमा योजना, मृदा आरोग्य पत्रिका योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कृषी यांत्रिकीकरण योजना आणि विविध राज्यस्तरीय अनुदान योजना यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. पीक विमा योजना ही नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देणारी महत्त्वाची योजना मानली जाते. मात्र, विमा नोंदणी, नुकसान भरपाईचे मूल्यांकन आणि दाव्यांच्या निकाली प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणि गती आणण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जाते. शासनाच्या योजना केवळ कागदोपत्री न राहता त्यांचा लाभ प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे.शेतकऱ्यांसमोरील आर्थिक आव्हाने ही आज गंभीर चिंतेची बाब ठरली आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि इंधन यांच्या वाढत्या किमतींमुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. दुसरीकडे शेतीमालाला मिळणारा भाव अनेकदा अपेक्षेपेक्षा कमी असतो. बाजारपेठेतील चढ-उतार, मध्यस्थांची भूमिका आणि साठवणुकीच्या मर्यादित सुविधा यांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळण्यात अडचणी येतात. कर्जबाजारीपणा ही अनेक शेतकरी कुटुंबांसमोरील वास्तव परिस्थिती बनली आहे. अशा वेळी शाश्वत शेती व्यवस्थापन, उत्पादन खर्चात बचत आणि मूल्यवर्धनाच्या संधींचा शोध घेणे आवश्यक ठरते.शेतीशी संबंधित सामाजिक आव्हानेही तितकीच गंभीर आहेत. ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर, शेतीकडे कमी होत चाललेला तरुणांचा कल, लहान होत जाणारी जमीनधारणा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे वाढते ओझे यांचा शेती क्षेत्रावर परिणाम होत आहे. आज अनेक शेतकरी कुटुंबांमध्ये महिलांचा शेतीतील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पेरणीपासून काढणीपर्यंत विविध कामांमध्ये महिला महत्त्वाची भूमिका बजावत असल्या, तरी त्यांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहते. महिलांना प्रशिक्षण, आर्थिक सक्षमीकरण आणि निर्णय प्रक्रियेमध्ये समान सहभाग मिळणे आवश्यक आहे.शेतकरी उत्पादक कंपन्या आणि स्वयं-सहाय्यता गट हे ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम ठरू शकतात. सामूहिक खरेदी, सामूहिक विक्री आणि तांत्रिक सल्ल्याच्या माध्यमातून लहान शेतकऱ्यांनाही स्पर्धात्मक बाजारपेठेत टिकून राहण्याची संधी मिळू शकते. एकट्याने संघर्ष करण्यापेक्षा समूहाच्या माध्यमातून पुढे जाण्याची मानसिकता विकसित होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील युवकांनी कृषी उद्योजकतेकडे वळल्यास शेती क्षेत्रात नवे बदल घडू शकतात.हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक विविधीकरणालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. एकाच पिकावर अवलंबून राहण्याऐवजी विविध पिकांची लागवड, आंतरपीक पद्धती, पशुपालन, मत्स्यपालन आणि पूरक व्यवसायांचा अवलंब केल्यास उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण होऊ शकतात. त्यामुळे जोखीम कमी होते आणि आर्थिक स्थैर्य वाढण्यास मदत होते. पारंपरिक ज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा समन्वय साधून स्थानिक परिस्थितीनुसार शेती पद्धती विकसित करणे ही भविष्यातील गरज आहे.पेरणीसाठी योग्य वेळ निश्चित करणे ही केवळ तांत्रिक बाब नसून ती शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित प्रक्रिया आहे. योग्य वेळी घेतलेला निर्णय उत्पादन वाढवू शकतो, तर चुकीच्या वेळेवर केलेली पेरणी मोठ्या आर्थिक नुकसानीस कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे हवामान अंदाज, जमिनीतील ओलावा, बियाण्यांची उपलब्धता आणि संसाधनांची तयारी या सर्व बाबींचा विचार करूनच पेरणी करणे आवश्यक आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, संयम आणि नियोजन या दोन गोष्टी खरीप हंगामातील यशस्वी शेतीचे मूलमंत्र आहेत.महाराष्ट्रातील शेतकरी अनेक संकटांना तोंड देत असतानाही नव्या उमेदीने शेती करीत आहे. नैसर्गिक आपत्ती, आर्थिक अडचणी आणि सामाजिक बदल यांच्या छायेतही त्याची जिद्द अबाधित आहे. प्रत्येक खरीप हंगाम हा त्याच्यासाठी नव्या आशांचा, नव्या शक्यतांचा आणि नव्या संघर्षांचा प्रवास असतो. पावसाच्या पहिल्या सरी जमिनीला जशा नवसंजीवनी देतात, तशाच त्या शेतकऱ्यांच्या मनातही नव्या विश्वासाची पालवी फुलवतात.आज आवश्यकता आहे ती शेतीकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून न पाहता, ती एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय जबाबदारी म्हणून स्वीकारण्याची. अन्नसुरक्षा, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य यांचा पाया शेतीवरच उभा आहे. शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यासाठी शासन, संशोधन संस्था, समाज आणि ग्राहक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या श्रमांचा सन्मान करीत त्यांना आवश्यक सुविधा, योग्य बाजारपेठ आणि तांत्रिक मदत उपलब्ध करून देणे ही काळाची मागणी आहे.पावसाच्या चाहुलीत सुरू होणारे पेरणीचे नियोजन हे केवळ कृषी व्यवस्थापनाचे काम नसून ते भविष्य घडविण्याचे कार्य आहे. बदलत्या वातावरणाशी जुळवून घेत, नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करीत आणि पारंपरिक ज्ञानाची सांगड घालत महाराष्ट्रातील शेतकरी अधिक सक्षम होऊ शकतो. संकटे कितीही मोठी असली, तरी नियोजन, दूरदृष्टी आणि सामूहिक प्रयत्न यांच्या बळावर त्यांच्यावर मात करता येते. शेवटी, योग्य नियोजन, हवामानाची अचूक माहिती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्या आधारे शेतकरी संकटांवर मात करू शकतो, हा विश्वास अधिक दृढ करण्याची हीच वेळ आहे. कारण शेतकऱ्याचा आशावाद, त्याची जिद्द आणि श्रमशीलता यांच्याच बळावर देशाची अन्नसुरक्षा आणि समृद्धी अवलंबून आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ जून २०२६


## हिंदू खाटीक समाजातील उमेदवारांना आवाहन

**बीड, दि.१२ (भगवंत पाळवदे)** : मागासवर्गीय समाजातील घटकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी आणि त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळातर्फे सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत विशेष घटक योजना आणि बीजभांडवल योजना या दोन महत्त्वाच्या योजनांसाठी जिल्ह्यातील इच्छुक व पात्र हिंदू खाटीक समाजातील उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. या वर्षी दोन्ही योजनांसाठी प्रत्येकी केवळ ३ लाभार्थ्यांचे मर्यादित उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात कर्ज मागणी अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. इच्छुकांनी अर्ज पूर्ण भरून, त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडून जिल्हा कार्यालयात स्वतः उपस्थित राहून मूळ प्रत सादर करावी. कोणत्याही त्रयस्त व्यक्तीमार्फत अर्ज किंवा वैधानिक दस्तऐवज स्वीकारले जाणार नाहीत.

तरी योजनांची सविस्तर माहिती आणि अर्जासाठी लाभार्थ्यांनी जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला, बीड संपर्क क्र. ०२४४२-२२२६१४ येथे संपर्क साधावा. असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## जिल्ह्यात १० दिवसीय विशेष क्रीडा शिबिराचे आयोजन

**बीड, दि. १२ (भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यातील क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करणे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी खेळाडूंना तंत्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने एका विशेष क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सॉफ्टबॉल, बेसबॉल व मैदानी खेळांच्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली. क्रीडा विषयक शिबिर दि.१६ ते २५ जून २०२६ या दहा दिवसांच्या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे संपन्न होणार असून, खेळाडूंच्या सुविधेसाठी दररोज सकाळी ६ ते ९.३० आणि दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७ अशा दोन सत्रांमध्ये हे प्रशिक्षण दिले जाईल. या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मैदानी प्रशिक्षणासोबतच खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष समुपदेशन व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शिवछत्रपती पुरस्कारार्थी नं. पो. शेळके खेळाडूंना खेळाविषयी सखोल माहिती देतील, तर गुणवंत क्रीडा मार्गदर्शक अविनाश बारगजे हे क्रीडा क्षेत्रातील संधी व करिअर याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रीमती राधा तांबे या योगसाधनेच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीचे धडे देतील. तसेच, खेळातील दुखापतींवर मार्गदर्शनासाठी डॉ. कुलदीप शहाणे आणि योग्य आहाराविषयी माहिती देण्यासाठी आहारतज्ज्ञ डॉ. सूरज कोकणे उपस्थित राहणार असल्याने खेळाडूंना एकाच छताखाली दर्जेदार मार्गदर्शन लाभणार आहे. या शिबिरात सॉफ्टबॉलसाठी सतीश राठोड, बेसबॉलसाठी रेवननाथ शेलार आणि मैदानी खेळांसाठी अविनाश पाटील हे तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शक म्हणून खेळाडूंना तंत्रशुद्ध प्रशिक्षण देतील. शिबिरात नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी खेळाडूंनी सतीश राठोड (९९२३०१९३५३), रेवननाथ शेलार (९०७५४७६७५१) किंवा अविनाश पाटील (९६२३७८११२१) यांच्याशी थेट संपर्क साधावा, जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्रीडा विभागाने केले आहे.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# चौका शिवारात तिफण मृगोत्सवातून वैचारिक पेरणी



**मृ**ग नक्षत्राच्या पहिल्या सरीची वाट पाहत बसलेला शेतकरी जसा मातीत बी पेरतो, तसाच विचारही पेरला गेला चौका शिवारात. १ १ जून रोजी छत्रपती संभाजीनगरच्या चौका घाटाजवळील डोंगरे वस्तीच्या मोकळ्या शेतात झालेल्या 'तिफण मृगोत्सवात' फाळ्याचा घर्षणध्वनी, कवितेची ओळ आणि जलसंवाद एकाच वेळी घुमला. झाडांच्या सावलीत, मातीच्या वासात आणि मोकळ्या आकाशाखाली झालेल्या या सोहळ्याने शेती हा केवळ व्यवसाय नसून संस्कृती आणि अस्मितेचा भाग आहे, हे पुन्हा अधोरेखित केले.त्रैमासिक 'तिफण', भाषा-साहित्य-संस्कृती-संशोधन परिषद आणि सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती यांनी मिळून हा उपक्रम उभा केला. उद्देश स्पष्ट होता - शेतकऱ्यांच्या प्रश्नाला फक्त आकडेवारी आणि योजनांच्या चौकटीत न अडकवता, तो साहित्य, लोककला आणि पर्यावरणाच्या संदर्भात मांडणे. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक तिफण पूजनाने झाली. खऱ्या शेतकऱ्याच्या हातून फाळाला हळद-कुंकू लावून झालेल्या उद्घाटनाने संपूर्ण वातावरणात एक वेगळीच उर्जा संचारली. 'तिफण' म्हणजे फक्त अवजार नाही, ती श्रमाची निशाणी आहे आणि विचारांची सुरुवातही आहे, हा संदेश प्रत्यक्ष अनुभवता आला.विचारांची पेरणी : मृगोत्सवाचा गाभा होता 'विचारांची पेरणी' हे संवादसत्र. व्यासपीठ शेतात नव्हते, थेट शेतातच चर्चा रंगली. ग्रामसुराज्य फाऊंडेशनचे संचालक आणि जलतज्ञ प्रकाश चोले यांनी येणाऱ्या काळात पाण्याचा प्रश्न अधिक तीव्र होणार असल्याचे सांगितले. "समृद्धी हवी असेल तर प्रत्येक गावाने पाण्याचे नियोजन स्वतः करावे लागेल. चौका परिसरात जलसिंचनाची कामे करण्यासाठी आम्ही तांत्रिक सहकार्य देऊ," अशी ग्वाही त्यांनी दिली. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत मुगले यांनी रासायनिक शेतीच्या दुष्परिणामांवर भाष्य करत सेंद्रीय शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. "जमीन विषारी होत चालली आहे आणि त्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो आहे. सेंद्रीय शेती करणाऱ्यांसोबत आम्ही बाजारपेठ आणि तंत्रज्ञानासाठी उभे राहू," असे त्यांनी सांगितले. ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाघ यांनीही शेतकरी हिताच्या उपक्रमात तनमन धनाने सहभागी होऊन सर्वतोपरी सहकार्य करू. असे मत मांडले.संत साहित्यात शेती आणि पर्यावरण कसे जोडले गेले आहे, याचा अभ्यासपूर्ण आढावा डॉ. रामचंद्र झाडे यांनी घेतला. नामदेवांच्या भारूडापासून बहिणाबाईंच्या कोवळ्या ओव्यांपर्यंत शेतकरी जीवन आणि निसर्गाशी असले नाते त्यांनी उलगडले. याच सत्रात 'तिफण'चा मराठवाड्यातील साहित्य विशेषांक प्रकाशित झाला. सोबतच विक्रमी उत्पादन घेणाऱ्या तीन प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान करून इतरांसाठी प्रेरणेचा मार्ग दाखवला गेला.कविता आणि प्रबोधनात्मक गीतातून : शेतकऱ्यांच्या व्यथा दुपारनंतरचा काळ कवितेला आणि लोककलेला खुला झाला. सुप्रसिद्ध कवी आणि पोशिंदाकार सुनील डोके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनात शेतकऱ्यांच्या जगण्याचे विविध पदर उलगडले. अशोक शेवगण यांनी मृग पाऊस लांबल्याने मनात निर्माण झालेली अस्वस्थता मांडली, तर प्रकाश साळवे यांनी रोजच्या कष्टाची आणि दुर्लक्षाची कथा सांगितली. संदीप ढाकणे यांच्या कवितेत शेतकरी आत्महत्येचे विदारक चित्र होते, तर डॉ. सुभाष बागल यांनी 'चिमण्या का दिसत नाहीत' या प्रश्नातून पर्यावरणीय बदलांवर बोट ठेवले.वृषाली सोनवणे यांच्या 'सुखनेचे दुखने' या कवितेने नदीच्या प्रदूषणाचा आणि दुर्लक्षाचा वेध घेतला. दिपाली देवरे यांनी ग्रामीण स्त्रीचे शेतातले कष्ट आणि उपेक्षा मांडली. ज्ञानदेव डिघोळे यांनी मातीशी असले ऋणानुबंध सांगितले, तर डॉ. नागेश बोनतेवाड यांनी मृग नक्षत्राच्या आगमनानिमित्त आशा आणि धास्तीची द्वंद्वावस्था कवितेतून व्यक्त केली. विजय कुमार पांचाळ यांनी शेती आणि पाण्याच्या प्रश्नावर चिंतनात्मक मांडणी केली.कवितेनंतर रंगलेला कार्यक्रम होता संत भगवान बाबा लोककला मंच, चौका यांचा. व्यसनमुक्ती, घंटागाडी, पाणी प्रश्न आणि पर्यावरण जागृती या विषयांवर त्यांनी गीत आणि साभिनयच्या माध्यमातून केलेले प्रबोधन थेट गावाच्या भाषेत होते. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये बसलेले शेतकरी, महिला आणि तरुण वर्ग क्षणभरातच त्यात सामील झाला.ठराव आणि दिशा - दिवसभराच्या चर्चेअंती केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष मागण्याही मांडल्या गेल्या. चौका परिसराला पर्यटन स्थळ घोषित करून भरीव निधी द्यावा, शेतकऱ्यांची सरसगट कर्जमाफी करावी, ऑनलाईन खते नोंदणी प्रणाली रद्द करावी, पिकाला हमी भाव द्यावा, सुखना नदीच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष निधी मंजूर करावा, दुधदर वाढवावा आणि तिफण मृगोत्सव दरवर्षी भरवावा, असे ठराव एकमताने मंजूर झाले.कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. भूमिका मांडताना ते म्हणाले की, हा शेतीमातीचा व कष्टाचा सन्मान करणारा उत्सव आहे. तिफण हे शेतकरी समाजाचे, कृषी संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे त्रैमासिक आहे. मृग म्हणजे शेतकऱ्यांचा पेरणीचा महोत्सव आहे. या निमित्ताने प्रबोधन व शेती प्रश्नावर विचार मंथन व्हावे. शेतकरी समाजाला प्रतिष्ठा मिळावी, त्यांच्या संघर्षात सोबत आहोत ही भावना मांडता यावी यासाठी हा महोत्सव सुरू केला आहे. या निमित्ताने वैचारिक पेरणी होईल. असेही ते म्हणाले. सूत्रसंचालन विजयकुमार पांचाळ आणि आभार प्रदर्शन प्रकाश साळवे यांनी केले. समारोप डॉ. रामचंद्र झाडे यांनी केला. रामभाऊ डोंगरे, दगडूभाऊ वाघ, संतोष वाघ, शंकर बोंगाणे, विश्वनाथ डोंगरे, सोमिनाथ वाघ आणि संपूर्ण आयोजक मंडळाने दिवसभराच्या नियोजनात मेहनत घेतली.संपलेल्या कार्यक्रमानंतरही शेतात बसले लोक लगेच उठले नाहीत. कारण इथे चर्चा संपली नव्हती, ती सुरूच राहिली होती - मातीशी, पाण्याशी आणि माणसाशी जोडलेल्या प्रश्नांची.

तिफण मृगोत्सवाने दाखवून दिले की शेतीला जर संस्कृतीची जोड मिळाली, तर ती केवळ जगवत नाही, तर दिशा दाखवतेही.


**डॉ. शिवाजी हुसे**
**संयोजक - तिफण मृगोत्सव**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ जून २०२६


# तू शतकांचा एल्गार : समतेच्या ऋणाईचा वारसदार




**क**वी स्नेही सन्मित्र बुद्धभूषण साळवे यांचा दीर्घ कवितांचा हा सम्यक संबुध्दांच्या विचारांचा अथांग अक्षरवेलूची ही उद्देशिका आहे.विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी कृतज्ञ भावनेतून अभिव्यक्त केली आहे.संयत विचारांची धार निर्धार शब्दांगार हा या कवितेचा मर्मग्राही आस्वासक अनुबंध आहे.संविधान हे या भारताची शान आहे.हे अथांग वैभवशाली ज्ञान म्हणजे बहुजनांच्या जीवन उजळून निघणाऱ्या जीवनाची पहाट आहे.या ज्ञान पंडिताने अवघ्या मानवांचे कायद्याच्या शस्त्राने कल्याणचंकेले आहे."तू पुकारलस बंड विकृती विरोधात तू लढलास, माणसाला माणूसपण देण्यासाठी आणि झालास तू शतकांचा एल्गार...(पृ.२५) ही कविता इतकी संयत मनोभूमिकेतून आली आहे की, बाबासाहेब फक्त तूमच्यमुळेच आम्ही अज्ञान अंधारातून,धर्म कर्मकांडातून बाहेर निघालो.एक मनमुक्तीचा श्वास मिळाला.हजारो वर्षे अज्ञान अंधारात खितपत पडलेल्या सर्वहरा समाजाच्या उन्नतीसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिशादर्शकाचे अक्षरलेणी कायद्याच्या पानावर लिहून ठेवले आहे.म्हणून 'तू शतकांचा एल्गार'ही बुध्दभूषण साळवे यांची ऋणाईची कविता.एका सच्चा भीमसैनिकाची अक्षरलेणी आहे.बाबासाहेब तुम्ही तुमच्या साठी एकुण सर्वस्तरातील मानव जातीच्या उन्नतीसाठी जे केले तेच युगानुयुगे आज 'तू शतकांचा एल्गार'"तू केलंस जन्मोजन्माना सूर्योन्मुखब्रम्हांडालाही पुकारता आलं नाही तुझ्याविरोधात युद्ध असा तू देदीप्यमान युध्दा"(पृ.२९) या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे प्रतिगाम्यांना स्वातंत्र्य,समाता, बंधुता बंधुतेचे पाठ दिलेस,इथल्या गुलामांचा हातातल्या बेड्या तोडल्या अन् हातात लेखणी दिली.इथे जात धर्म पंथ अन् वंशावळीच्या जात्यांध खनपुटाला उखडून काढलस.हे मुक्ततेच नितळ निळ आभाळ ओंजळभरून देताना बाबासाहेबांनी चवदार तळ्याचे पाणी दिले अन् हा सर्वहार तहानेने व्याकूळ झालेला वेदनांचा समाज त्यांच्या जगण्यात लढण्याची उर्मी वाढवली.म्हणजे या सृष्टीलाच पाण्याची अस्मिता शिकविली.पाण्यात जात नसते.पाणी पवित्र आणि पाक असते.बाबासाहेबांचा हा पाण्याचा संगर म्हणजे या दीन दुबळ्यांच्या जगण्याचा मुक्तीदाता म्हणून ही इतिहासाच्या पानावरची एक उर्जस्व लढाई आहे.जी आज आम्हाला नवी मुक्त जगू देते.या लोकशाहीला घटना दिली.पण इथल्या नतदृष्ट अनभिज्ञ यांनी विषमतेचे काटेरी मुकुट चढवले.काही फुटीरवादी,चलवादी,चहाटळ, यांच्या चिंध्याचपाट्या आणि विकृत विचार तुमच्या विधायक विचाराला बाधा आणतात इथले हलकट जातीयवादी.हीसंवैधानिक संविधान अमलात आले त्यातही ते लवचिकता अन् पाहता आहेत."तळागाळातल्या उपेक्षितांचा तू झालास कैवारी उष्टाळलेल्या जगण्याला नाकारून तू घातलीस क्रांतीची नवी पिढी जन्माला "(पृ.२६)ही एक हळव्या सृजनशील प्रज्ञावंताची कविता आहे.आपण इतके शिकलो अन् बाबासाहेबांच्या विचार धारेचा अंगीकार करुन आपल्या समाज बांधवांसाठी नव्याने ही बाबासाहेबांच्या सम्यक विचारांची पेरणी केलीच पाहिजे म्हणून ही कविता ऋणाई व्यक्त करणारी आहे.कारण बाबासाहेब हे अखंड युगाचे युगंधर होते.हा युगाचा महानायक कृतीउक्तीचा एल्गार पुकारणारा योध्दा होते.बाबासाहेब या विश्वातील लाखो कवीने,भीमगीतकारांने आणि वामन दादा कर्डकाने आपल्या शब्दकवनाने त्यांच्या कंठातून अजरामर झाले आहेत.बुध्दभूषण साळवे साहेबांनी या कवितेत उच्च विभूषित प्रज्ञेचा व प्रतिमांचा शब्दांगार अलवारपणे मांडला आहे.कारण बाबासाहेब वाचून आत्मसात करावे आणि पंचशिल तत्वाने अंगीकारावे हे निश्चित निस्सीम बाबासाहेबांची भक्ती व शक्ती देणारे प्रबुद्ध विचार या कवितेचे आहे.'खुरुड्यातलं जगणं,नवक्रांतीचा महासागर,फोडलस रणशींग, पृथ्वीच्या पोटी पेरलीस मानवता,खेळवलं नाही मनुवृतीला, पराकोटीचासंघर्ष,काळोखातील निर्दयी झळा, झालास प्रकाशमार्ग, झालस वेदनेचा आवाज, नरकयातना नेस्तनाबूत, धर्ममार्तंडास घातली येसण,ढोंगी सैतानाला पाजलं पाणी,क्रांतीचे अक्षरं, कटकारस्थान दृष्टी दिली,रांडक्या मुंडक्या आभाळाला चवदारचं पाणी, सृष्टीला शिकवली पाण्याचीअस्मिता,वेशीची तटबंदी,या ब्रम्हांडाचा देदिप्यमान योध्दा,पृथ्वीच्या नाभीला नख, पाशवीपणाचं दफन, निर्जीवतेला मढवलस,शुद्र हिणवणाऱ्या पर्यक्युलेशन,समष्टिचा मार्ग,घुबडांच्या अरण्यात,निळ्या पाखराची सुटका, अंधाराची शरणागती,तू केलस प्रबुद्ध,जातीयतेचा महारोग, निशिगंधा सारखे पांढरेशुभ्र जीवन,तूच सर्वेसर्वा, लिंगाला भक्तीचं जाणवं, धर्मांध पुजाऱ्यांना आग,आत्मोद्वाराठीस्वयंप्रकाशी व्हा,कुलटा अन् दासी भोगवस्तू,कसायाच्या दावणीतून बाईची सुटका, हिंदू कोडबिल, अभिव्यक्तीचा मळवट,बाई मुलभूत पाया,जाती धर्माची वर्गवारी नाही केली,जातनावाचं रसायन,पुरातन विषाचं मांडगुळ, हुकूमशाही नावाचा सांड,निबर कातडीचा घोडेबाजार,क्रांतीचं रक्त तुच दिलसं आम्हाला, विचारांचा बोध्दिचिन्ह,धर्मांधाची पुंगी, विभक्तीची अफू, तुझ्या सिद्धांतचं अधिष्ठान, विश्वव्यापीविचारांची पालवी, विचारगर्भाला पाय,मी जातीचं ओझं घेऊन जगणारं नाही, जसर्वधर्मसमभावाची जंत्री आचरणात.या सृजनशील चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक समृद्ध सकारात्मक विचारधारेच्या प्रतिमातून ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानची ठणक व्यक्त करते.ही कविता सर्वव्यापी आहे."आजही जळतोय दारिद्र्याच्या सरणावर दारिद्र्याचं मढ ओढणारा इथला शेतकरी आजही होऊ शकतं नाही सुजलाम सुफलाम तुझ्या कृषी विचारांची,जर झाली असती अंमलबजावणी.तर इथला शेतकरी आढ्याला टांगून मेलाच नसता कधी"(पृ.४७)कवी बुध्दभूषण साळवे बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करून चिंतन मंथन मर्मबंध सांगून ही ऋणाई व्यक्त करीत.समकालीन वास्तवाचे यथोचित चिंता ही मांडता आहेत.आंबेडकरी साहित्याच्या अभ्यासक डॉ.श्यामल गरुड 'समतेचा वारसदार'म्हणून अभ्यासपूर्ण दीर्घ प्रस्तावना लिहितात"समतेच्या संगराती सिपाई गेल्या दशकभरापासून संभ्रमित वावटळीत भेलकांडतांनाही ते 'समतेचे वारसदार'आहेत. याचा विसर पडू न देता ते अखंडपणे लढत आहेत.धर्मांध वर्चस्ववादी कळपाला भिडण्यसाठी छातीला माती लावून बुद्धांने सांगितलेल्या दु:खनिरोधाच्या अष्टांगी लिपीलाचं शस्त्र मानून ते रस्त्यावर उतरले आहेत.आता लढाई चोहोबाजूंनी वाढली आहे.धर्माची दुकानं जोरात तापली आहेत.सामान्य माणूस रंणगणावरही भाकरीसाठीचं उभी आहेत असे वाटू लागले आहे.त्यांच्या हातात बळे-बळे कोंबलेले झेंडे आणि घशात सांस्कृतिक दहशतीच्या सलाईनातून दिलेल्या घोषणा त्यांना शहीद स्तंभापर्यंत घेऊन चालल्या की काय?असा आभास निर्माण केला जातोय.संस्कृतीच्यावाहतूकीतलं हे 'साटंलोटं' मधल्या फळीतल्यानी इमाने इतबारे स्वीकारालं आहे.पण बुद्धीवादी आंबेडकरी तरुण त्याच्या भोवतालच्या ज्ञानव्यवहाराची चिकित्सा करून उद्देशिकेची पानं चौखूर उधळतोय.कारण तो नंतर आलेल्या लोकांचा आणि मागच्या दारी व्यायलेल्या कुळाचा 'वारसदार'नाही; म्हणूनचं त्यांची लढाई थेट हमरस्त्याचीचं आहे"(पृ.१७,१८)ही प्रस्तावना म्हणजे अत्यंत चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचन करून एका सत्याच्या परिप्रेक्षात जाते.विश्ववंदनीय डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण सम्यक दृष्टीचा विचार घेऊन येणारी ही कविता आहे.अर्पण पत्रिकाचा मायना असा"विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ध्येय धोरणासाठी अविरत झगडणाऱ्या तळागाळातल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना"ही सविनय विचारांची बांधिलकी देऊन जाणारी कविता तर आहेच.या समग्र आंबेडकरी हुंकाराच्या कवितेचा मर्मग्राही अनुबंध (ब्लर्ब)पाठराखणीत आला आहे."क्रांतीची अक्षरे बाबासाहेबांनी इतिहासाच्या पानावर कोरली.त्याची कृतज्ञतापर कविता होणे, हे आम्हा सर्व बुद्धभूमीतील प्रज्ञासूर्याच्या लेकराची निर्मळ भावना आहे.'पृथ्वीच्या ओंजळीत पेरलीस मानवता'ही बुद्धभूषण साळवे यांच्या कवितेतील भूमिका किती व्यापक आहे.मानव तत्वाला पुरुन उरणारे बाबासाहेब हा आमच्या महाकाव्याचा विषय आहे.अशी विचारांची भक्कम भूमिका मांडत उभी आहे.ही विचार, चरित्र, आणि बाबासाहेबांच्या उजेडाचा परिघ मांडणारी कविता आहे.सूर्याचं तेज अधोरेखित व्हाव आणि या सूर्याची प्रखरता प्रत्येकाच्या काळजात ठिणगी सारखी नाही,तर फुलासारखी फुलावी हीच या कवितेची भूमिका आहे.प्रज्ञासूर्याला अंतःकरणात फुलवणाऱ्या या भाव शब्दांच्या मांडणीत बाबासाहेबांचं 'साहेब'पण शब्दा शब्दातून पाझरत राहतं."(इंद्रजित घुले)कवी,चिंतन चिकित्सक संपादक इंद्रजित घुले यांची समर्पक समृद्ध पाठराखण हे या कवितेचे श्रेयस आहे.



**पुस्तक:-तू शतकांचा एल्गार'**
**कवी लेखक:-बुध्दभूषण साळवे**
**प्रकाशक:-शशिकांत पवार, ललित पब्लिकेशन,मुंबई**
**मुखपृष्ठ:-बुध्दभूषण साळवे**
**प्रथमावृती:-१४ एप्रिल २०२५**
**किंमत:-१८०/रूपये**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना**
**संवाद:-९९७५१३७३३७**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ जून २०२६

# चला, पाल्यांना जि.प. च्या मराठी शाळेत घालू या!

जि.प.च्या शाळांना प्रवेशासाठीनिवडूया !

जून महिना उजाडला की नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागते. घराघरांत मुलांच्या शाळा प्रवेशाची लगबग सुरू होते. आपल्या पाल्याला कोणत्या शाळेत प्रवेश द्यावा, हा प्रत्येक पालकासमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. अशा वेळी एक मराठी माणूस, एक जबाबदार पालक आणि आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणारा नागरिक म्हणून आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे — "आपल्या मुलाला जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत प्रवेश का देऊ नये?"

आज आपल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम शिक्षक, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहेत. याला आणखी उंचीवर पोहोचविण्यासाठी आवश्यक आहे तो पालकांचा विश्वास ! आणि पालक म्हणून आपला सक्रिय सहभाग ! केवळ अफवा आणि यंत्रणेसंदर्भातील नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण भागातील कमी खर्चाची, योग्य गुणवत्तेची आणि संस्कार करणारी एक यंत्रणा आम्ही कमकुवत तर करत नाही ना ? हा प्रश्न एकदा स्वतःला विचारणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी.या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ,डॉक्टर, वकील,कवी, लेखक,कृषी तज्ञ,समाज सुधारक तयार झाले आहेत. विशेषतः मराठी माध्यमातू शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे.अपार कष्ट ,अवहेलना सहन करून अशा शाळांमधून शिक्षण घेत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. देशातील मोठमोठ्या संस्थांवरचे गुणवान जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच तयार झाले आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आणि विशेषतः जिल्हा परिषद शाळांच्या दारी नेण्याची हीच योग्य वेळ आहे.

जिल्हा परिषद शाळा : गुणवत्तेची खात्री

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित असते. शिक्षक पात्रता परीक्षा (TET), विविध स्पर्धात्मक प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे समाजातील गुणवंत, प्रशिक्षित युवकच शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होते. प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक हा प्रश्न निकाली निघाला आहे.

शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. आपल्या गुरु शिष्य प्राचीन परंपरेला याच शाळा पुढे घेऊन गेल्या आहेत. येथील शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, संस्कारांसाठी, देशाच्या आधुनिक शैक्षणिक धोरणांशी जोडले गेले असतात. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्था अर्थात आपल्या शाळा जबाबदार नागरिक घडविणारी यंत्रणा म्हणून पुढे आल्या आहेत.

मातृभाषेतून शिक्षण : अधिक आत्मविश्वास देणारे

शैक्षणिक संशोधन सातत्याने सांगते की, मुलांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले तर त्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. मराठी माध्यमातून शिकणारी मुले केवळ भाषा शिकत नाहीत, तर आपल्या संस्कृतीशी, इतिहासाशी, परंपरांशी, वारशाशी आणि सामाजिक मूल्यांशी जोडली जातात.

मराठी भाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ते आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकतात. इंग्रजी व अन्य भाषा शिकणे आवश्यक आहेच; परंतु शिक्षणाचा पाया मातृभाषेत असणे अधिक परिणामकारक असल्याचे अनेक जागतिक तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

सर्वात मोठे बलस्थान : समर्पित शिक्षक

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना शासनाकडून नियमित व पूर्ण वेतन दिले जाते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण लक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांचा विकास आणि शाळेच्या प्रगतीकडे केंद्रित राहते. काही समर्पित शिक्षक स्वतःच्या खर्चातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देतात, विविध उपक्रम राबवितात आणि गावोगावी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवतात. साने गुरुजींच्या महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी शिक्षकांच्या नावाने ती शाळा ओळखल्या जाते.

आज अनेक जिल्हा परिषद शाळांनी डिजिटल वर्गखोल्या, संगणक शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा, क्रीडा साहित्य आणि विविध नवोपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.सेमी इंग्लिश शिक्षण पद्धती शाळांनी अवलंब केली आहे.शालेय व्यवस्थापन समिती आणि माझी विद्यार्थी मंडळाकडून अनेक सुधारणा होत आहे.

राज्याचे शैक्षणिक धोरण ;मातृभाषेचे महत्त्व

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तसेच महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षण देण्याला विशेष महत्त्व देते. मुलांचा बौद्धिक विकास, भाषिक कौशल्ये आणि संकल्पना समजून घेण्याची क्षमता वाढविण्यासाठी मातृभाषा हे सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे या धोरणांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.याच विचारातून महाराष्ट्रातील मराठी शाळांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. विशेष म्हणजे कला, क्रीडा, स्पर्धा परीक्षा या संदर्भातील मुलांच्या विकासाची यंत्रणा, श्रृंखला याच शाळांमध्ये पूर्ण होते. इथे निधी अभावी कधीही विद्यार्थ्यांच्या खिशातून पैसा काढून स्पर्धा घेतली जात नाही, रद्द होत नाही,पुढे ढकलली जात नाही. क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, शिक्षकांचे प्रशिक्षण एकदा ठरले की पूर्ण केले जाते. राज्याच्या बाल कल्याण धोरणाला, बौद्धिक धोरणाला याच व्यासपीठावर राबविले जाते. त्यामुळे या यंत्रणेतून आपण बाद तर होत नाही ना ? याचा विचार व्हावा.

आता प्रवेशासाठी लागतात रांगा

एक काळ असा होता की काही पालकांना जिल्हा परिषद शाळा म्हणजे ग्रामीण भागातील भक्कम पर्याय वाटत असे. मात्र, अफवा, गैरसमज,आणि काही अपवादात्मक घटनांनी या शाळा मधल्या काळात ओस पडायला लागल्या होत्या. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपल्या गुणवत्तेमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे.सातारा, कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर, जळगाव आणि इतर अनेक जिल्ह्यांतील काही जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांची मोठी मागणी दिसून येते.अनेक शिक्षकांनी आपल्या दायित्वातून,गुणवत्तेतून,कल्पकतेने शाळांना नवी ओळख दिली आहे. डिजिटल शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संस्कारक्षम वातावरण आणि विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट निकाल यामुळे या शाळांवर पालकांचा विश्वास वाढत आहे.

नवे शैक्षणिक धोरण ;शाळांनी कात टाकली

काही ठिकाणी अपवादात्मक शाळांच्या जीर्ण इमारती व आवश्यक सोयीसुविधांची कमतरता दिसते. त्यामुळे पालकांनी केवळ भौतिक सुविधा बघून शाळांबाबत भूमिका बनविणे अयोग्य आहे.गरिबातील गरीब विद्यार्थ्यापासून सर्वांना शिक्षण मिळावे, अशी समतोल भूमिका शासनाची आहे.त्यामुळे अतिशय माफक शुल्कामध्ये या शाळेतील शिक्षण मुलांना घेता येते.आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक ॲप शाळांनी विकसित केले आहे.शिक्षकांना जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे लागत आहे.निपुण शाळा या मोहिमेतून शाळातील शिक्षणावर नियंत्रण ठेवले जात आहे. तिसऱ्या वर्गापासून प्रज्ञाशोध परीक्षा, चौथी व सातवीत होणारी स्कॉलरशिप परीक्षा, टॅलेंट सर्च परीक्षा,शालेय गणवेष, शालेय पोषण आहार, सगळ्यांना मोफत पुस्तके, केळी व अंडी वाटप, मुलींसाठी दैनिक भत्ता, मुलींना स्वतंत्र स्वच्छता गृह, सॅनेटरी नॅपकीनची उपलब्धता ,प्रवेश उत्सव, संस्कार शिबीर,अशा विविध उपक्रमांना शाळेत राबविण्यात येते. पहिलीपासून इंग्रजी अनिवार्य केले आहे. त्यामुळे इंग्रजी पासून कोणी वंचित राहत नाही. प्रत्येक जिल्ह्यातील काही शाळा सेमी इंग्लिश झाल्या आहेत. याशिवाय या सर्व यंत्रणेवर पालकांच्या पाच समित्यांचे नियंत्रण असते.त्यामुळे बाह्य चकाकी व इंग्रजी माध्यमांच्या आग्रहातून मुले दर्जेदार प्रशिक्षित शिक्षकांपासून, शिक्षणापासून वंचित राहू नये यावर विचार करण्याची ही गरज आहे.

अनेक गावांनी शाळांसाठी घेतला पुढाकार

मराठी शाळा वाचविणे म्हणजे आपली ओळख जपणे होय.घरापासून योग्य अंतरावर असणारी शाळा मुलांना त्यांच्या बाल्यावस्थेत खेळ व अन्य कला गुणांसाठी भरपूर वेळ वाचवू शकते. गावातील शाळा बाजूला ठेवून शहरातील, तालुक्याच्या ठिकाणच्या शाळांसाठी पालकांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त खर्चही करावा लागतो. वाहन व्यवस्था करावी लागते. यामध्ये मुलांच्या जडणघडणीचा वेळ जातो. अनेक गावांनी ग्रामपंचायतीमार्फत ज्या पालकांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला त्यांना घरपट्टीतही सवलत दिली आहे.अनेक गावांनी शिक्षकांना मुख्यालयी राहणे अनिवार्य केले आहे. गावाचे, गावातील प्रमुखांचे ,शाळांकडे लक्ष असणे आणि शिक्षकांचे गावातच राहणे यामुळे आदर्श जीवनपद्धतीची जपणूक ही होते. गावाप्रतीचा आदरही वृद्धिंगत होतो. शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नसते; ती संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि समाजाची ओळख जपणारे केंद्र असते. गरीबी, श्रीमंती सोबत मिळणारे एकत्रित शिक्षण सामाजिक जाणिवा वृद्धींगत करते. त्यामुळे मराठी शाळा टिकल्या तर मराठी भाषा टिकेल. मराठी भाषा टिकली तर महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक बळकट राहील.

त्यामुळे आज आपल्या मुलाला मराठी शाळेत प्रवेश देणे म्हणजे केवळ एका शाळेची निवड नव्हे; तर आपल्या भाषेवर, संस्कृतीवर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर व्यक्त केलेला विश्वास आहे. पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी, नगरसेवक, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण तज्ञ या सर्वांनीच ही बाब अधोरेखित करावी. अनियंत्रित खासगी यंत्रणेचे फटके समाज व्यवस्थेला बसत असताना, शिक्षणाची ही मूळ साखळी पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन शाळांना, शाळेच्या यंत्रणेला बळकट करणे आवश्यक आहे.

चला, एक सकारात्मक निर्णय घेऊ या!

यंदाच्या शैक्षणिक वर्षात आपल्या गावातील, परिसरातील जिल्हा परिषद शाळेला भेट द्या. तेथील शिक्षकांशी संवाद साधा. शाळेच्या सुविधा पाहा. विद्यार्थ्यांचे यश जाणून घ्या. आणि मग आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी विचारपूर्वक निर्णय घ्या.

आमचे आई-वडील, आम्ही आणि आमची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलेलो आहे. त्यामुळे यावर्षी निर्धारपूर्वक ठरवूया, आपल्या पुढच्या पिढीतील पाल्यांना मराठी शाळेत घालू या...

मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा अभिमानाने वारसा पुढील पिढीकडे सुपूर्द करू शकतो



**भगवंत पाळवदे**
**अंबाजोगाई,जि.बीड**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002